**महिला किसान अधिकार मंच**

**MAHILA KISAN ADHIKAAR MANCH**

## महिला किसान अधिकार मंचच्या (मकाम) वतीने मदतीसाठी आवाहन!

कोरोना व्हायरसच्या प्रादुर्भाव संपूर्ण जगभर पसरला असून भारतात देखील बाधित रुग्णांची संख्या दिवसागणिक वाढत चालली आहे. कोरोनाचा प्रसार थांबविण्यासाठी दिनांक २५/३/२०२० पासून देशभर संचारबंदी लागू करण्यात आलेली आहे. अर्थातच कोरोनाचा प्रसार थांबविण्यासाठी ते आवश्यक आहे.

ह्या प्रक्रियेचा परिणाम केवळ शहरांपुरता मर्यादित राहिला नसून, ग्रामीण भागातही त्याचे परिणाम दिसून येत आहेत. प्रामुख्याने ग्रामीण भागातील हातावर पोट असणाऱ्या एकट्या स्त्रियांची परिस्थिती गंभीर झाली आहे. रोजच्या मजुरीवर अवलंबून असणाऱ्या ह्या स्त्रियांना घरी बसून काम करण्याचा पर्याय उपलब्ध नाही.

सध्याच्या परिस्थितीमध्ये ह्या महिलांचा मुख्य प्रश्न आहे तो अन्नधान्याचा. अनेक ठिकाणी रेशनचा तुटवडा तर आहेच, पण त्याच बरोबर ह्या महिलांकडे रेशन घेण्यासाठी पैसा देखील नाही. अनेक महिलांकडे रेशन कार्डच नसल्यामुळे रेशन त्यांना नाकारले जात आहे. सरकारशी संवाद चालूच आहे पण तोपर्यंत या महिलांना आधार मिळण्याच्या दृष्टीने हा प्रयत्न.

पुढील एक महिन्याच्या काळात ह्या महिलांना रेशन पुरवठा, तसेच तेल, मीठ मिरची सारख्या किरकोळ खरेदीसाठी हातात पैसे ही ह्या महिलांची तातडीची निकड आहे. सरकारने योजना जाहीर केल्या असल्या तरी ती मदत त्यांच्या पर्यंत पोहोचे पर्यंत आपले सहकार्य मोलाचे ठरेल.

मकाम (महिला किसान अधिकार मंच- www.makaam.in) विदर्भ आणि मराठवाड्यात शेतकरी आत्महत्याग्रस्त कुटुंबातील एकट्या महिलांबरोबर काम करते. **ह्या संकटाच्या काळात सरकारी यंत्रणेतून वगळलेल्या किमान ५०० एकट्या महिलांपर्यंत अन्न धान्यासाठी मदत पोहोचवण्याचे काम आम्ही करत आहोत. प्रत्येक वंचित महिलेस रु १००० पर्यंतचे धान्य व इतर किमान गरजांसाठी आवश्यक असे समान पुरवण्यासाठी आम्हाला पाच लाख रुपये गोळा करायचे आहेत. तरी ह्या कामात आपण देखील हातभार लावावा ही विनंती.**

MAKAAM Secretariat:
Gramya Resource Centre for Women, 12-13-440, Street No. 1, Tarnaka, Secunderabad 500 017
MAKAAM c/o SOPPECOM
16, Kale Park, Someshwarwadi, Pashan, Pune, Maharashtra 411008.
Phone: 8411994051. Email: mahilakisan.makaam@gmail.com Website: www.makaam.in

मकाम महाराष्ट्रचे सेक्रेटरीएट सोपेकॉम संस्थेमध्ये असून, येणारी मदत स्वीकारून, गावपातळीवर काम करणाऱ्या मकामच्या इतर सदस्य संस्थांच्या मदतीने महिलांपर्यंत ती पोहोचवण्याची जबाबदरी सोपेकॉम घेईल. (सोपेकॉमसंबंधी अधिक माहिती ह्या ठिकाणी मिळू शकेल: www.soppecom.org)

मदत करण्यास इच्छुक व्यक्तींनी पुढील इमेल व फोन वर संपर्क साधावा:

makaam.maharashtra@gmail.com

फोन संपर्क:

स्वाती सातपुते: 8390861253

पल्लवी हर्षे: 8446425667

स्नेहा भट: 9850813637

सीमा कुलकर्णी: 9423582423

महाराष्ट्र मकामची टीम

शुभदा देशमुख, जयाजी पाईकराव, डॉ. अहंकारी, वैशाली पाटील, सुवर्णा दामले, मनीषा तोकले, वीरभद्र हरोळे, दयानंद कदम, आरती बैस, नूतन माळवी, कौस्तुभ पंढरीपांडे, योगिनी डोळके, माधुरी खडसे, कुशावर्ता बेळे, सुनंदा खराटे, राजू केंधे, सीमा कुलकर्णी, पल्लवी हर्षे, नितीन जाधव, स्वाती सातपुते.